# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-३६ दिनांक - ०६/०२/२०२४

## मिरा-भाईदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडुन महाविद्यालय व विद्यालयाच्या प्राचार्यांच्या बैठकीचे आयोजन

श्री. मधुकर पाण्डेय. पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे सूचनांप्रमाणे परिमंडळ १ कार्यक्षेत्रातील विद्यालय, महाविद्यालय यांचे प्राचार्य व मुख्याध्यापक यांच्या बैठकीचे आयोजन पोलीस आयुक्त कार्यालयातील संवाद हॉल येथे करण्यात आले होते.

सदर बैठकीमध्ये मा. पोलीस आयुक्त यांनी सायबर क्राईम बाबत महीती देवुन त्यामध्ये के.वाय.सी. अपडेट करताना,क्रेडीट कार्ड पॉइट अपडेटश्, विज बिल भरताना, ऑनलाईन शॉपींग करताना व इतर बाबतीत सायबर क्राईम कसा होतो व त्याबाबत आपण काही काळजी घेतली पाहीजे जसे फसब्या एसएमएस पासुन सावधान राहणे,टेलीग्राम,व्हॉटसप वरती प्राप्त कोणतीही लिंक किंवा ॲप डाउनलोड करु नये याबाबत पोलीस आयुक्त यांनी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले व सदर माहीती ही महाविदयालयातील सर्व विद्यार्थांना देण्यास सांगितले. सोशल मिडिया वरती पोस्ट करताना सोशल मिडिया शिष्टाचाराचे पालन करावे तसेच कोणाचीही भावना दुखावणार नाही याबाबत खबरदारी घेवुन पोस्ट करतील. कायदा व सुव्यवस्था बाबतही मार्गदर्शन केले. तसेच पोलीस आयुक्त यांनी अंमली पदार्थाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम समजावुन सांगुन त्याबात जर अंमली पदार्थ विकणारे महाविद्यालये व विद्यालये च्या आवारात विक्री किंवा सेवन केले असताना मिळाल्यास पोलीसांना तात्काळ कळविण्याबात सांगितले.

तसेच प्रत्येक पोलीस ठाणे येथे ०१ टिम तयार करुन सदर टिम आपआपल्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय यांना भेटी देवुन तेथील विद्यार्थी यांना सायबर क्राईम, अंमली पदाथे, मोबाईल वापराबाबतचे दुष्परिणाम, सोशल मिडियावर जाती व धर्माबाबत तेढ निर्माण न होणाऱ्या पोस्ट प्रसारित करण्याबाबत तसेच महाविद्यालयातील मुलींना Good touch & bad touch बाबत माहिती देतील. सदर कार्यक्रमासाठी परिमंडळ ०१ कार्यक्षेत्रातील १३० पेक्षा अधिक विद्यालय व महाविद्यालयातील प्राचार्य व मुख्याध्यापक उपस्थित होते.

सदर बैठकीसाठी पोलीस आयुक्तालयातील पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय, अपर पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, श्री. प्रकाश गायकवाड तसेच परिमंडळ ०१ मधील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.